वसंतदादा पाटिल महाविद्यालय,पाटोदा

हिंदी विभाग

## हिंदी सप्ताह अहवाल

महाविद्यालय मैं हिंदी सप्ताह का आयोजन ८ सितम्बर२०२२ किया गया .इस सप्ताह का उद्धाटन महाविद्यालय के प्रधानाचार्य.प्रो.आबासाहेब हंगे इन के करकमलो किया गया .मंच पर स्नातोकोत्तर संचालक डॉ मनोज प्रकाश तथा विभाग प्रमुख डॉ बलिराम राख उपस्थित थे.

प्रस्ताविक प्रा.जयंत साठेने किया ,बलराज अविले ने हिंदी साहित्य का इतिहास एवं हिंदी भाषा का महत्व इस विषय पर छात्रों को मार्गदर्शन किया डॉ मनोज प्रकाश ने व्यावहारिक जीवनात भाषा महत्व ,बताया .अध्यक्षीय समारोप प्रो.हांगे इन्होने हरदिन की भाषा में राष्ट्रीय ,तथा आंतर्राष्ट्रीय भाषा का अवगत होना जरुरी हे,इस लिय मुबोली के साथ हिंदी अंग्रेजी भाषा का आना अनिवर्य हें. कार्यक्रम संचालन प्र कावेरी खुरने ने किया आभार प्रगटन सय्यद शातुर मनाया.

९ सितम्बर २०२२ को भाषण प्रतियोगिता का आयोजन किया गया इस में दस प्रतिभागी योने हिसा लिया.१०सितम्बर २०२२ को काव्य वाचन .११/९/२०२२ को चित्रकला व् निबंध प्रतियोगिता का आयोजन किया .

१४ सितम्बर २०२२ को महाविद्यालय में समापन समारोह का आयोजन किया गया इस में छात्रों ने हिंदी का महत्व इस विषय पर विचार रखे. अतिथि प्रोंफेसर सय्यद शौकत ,हिंदी विभाग प्रमुख तथा हिंदी अध्ययन मंडल के सदस्य ,डॉ बाबासाहेब मराठवाडा विश्व विदयालय, औरंगाबाद इन्होने हिंदी भाषा का महत्व तथा रोजगार की उपलब्धिया स्पष्ट करते हुएं हिंदी भाषा की सीमायें अब अपने देश की सीमा छोडकर विश्व की सीमा तक बनि हे.अध्यक्षीय समापन में प्रधानाचार्य प्रो. आबासाहेब हंगे ने अपने विचार प्रस्तुत किये.इस कार्यक्रम का प्रस्ताविक डॉ बलिराम राख ने किया संचालन प्रा.जयंत साठे ने किया आभार प्रा. बलराज अविले ने माना इस समारोह में प्रतिभागी को प्रमाण पत्र दे कर समानित किया गया.

प्रधानाचार्य

Principal
Vasantdada Patil Arts, Comm. &
Science College, Patoda, Dist.Beed.




**CHIEF GUEST PROFESSOR SAYYAD SHAUKAT DELIVERING SPEECH AT HINDI SAPTAH**



# हिंदी दोन मनांना जोडणारी भाषा - प्रो.सय्यद शौकत

पाटोदा दि. १४ (प्रतिनिधी ):- हिंदी ही जन, गण व मनाची भाषा असून ती दोन मनांना जोडण्याचे काम करते. माणसाला माणूस बनविण्याचे काम करते. हिंदीत जसे बोलले जाते तसेच लिहिले जाते अशी सर्वसामान्य भारतीयाला समजणारी हिंदी भाषा असूनही आपली हिंदीचे खाते परंतु हिंदीचे मात्र नाही ही दुर्दैवाची बाब आहे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या हिंदी अभ्यासमंडळाचे सदस्य व जयभवानी महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्रोफेसर सय्यद शौकत यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचलित यशवंतराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १४ सप्टेंबर रोजी आयोजित 'हिंदी सप्ताह समापन समारोह' कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गणेश पावसे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, हिंदी विभागप्रमुख डॉ. कासीम राव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कासिम राव यांनी केले. यावेळी प्रा. [illegible] शेख यांनी हिंदी भाषेच्या महतीविषयी मनोगत व्यक्त केले. प्रीती अडागळे, अमोल सांगळे, भाग्यश्री नागरगोजे, स्वाती होके या विद्यार्थीनी हिंदी भाषेचा गौरव व्यक्त करत आपली मनोगते व्यक्त केली. प्रोफेसर सय्यद शौकत आपल्या काव्यमय व खुमासदार शैलीतील मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले की, जागतिक स्तरावर १६० पेक्षा अधिक विद्यापीठांमधून हिंदी भाषेचा व साहित्याचा मोठ्या आदराने व कुतूहलाने अभ्यास केला जातो परंतु हिंदी आपली राजभाषा असूनही आपण भारतीय नागरिक हिंदी भाषेला विशेष महत्व देत नाही ही खेदाची बाब आहे. कित्येक लोकांना हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असूनही हिंदीचा दैनंदिन जीवनात ते वापर करत नाहीत, ही मानसिकता आता बदलणे गरजेचे आहे असेही आवाहन यावेळी त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की हिंदी ही सहज व सुलभ पद्धतीने शिकता येईल अशी भाषा असून मातृभाषेबरोबरच विद्यार्थ्यांनी हिंदी सोबत इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बलराज अविले यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. अनंत साळे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

---

दैनिक महाराष्ट्राचा मराठा नकाशा
लोकाशा
15SEP2022

# हिंदी दोन मनांना जोडणारी भाषा -प्रो.सय्यद शौकत

पाटोदा, दि.१४ (लोकाशा न्यूज):- हिंदी ही जन, गण व मनाची भाषा असून ती दोन मनांना जोडण्याचे काम करते. माणसाला माणूस बनविण्याचे काम करते. हिंदीत जसे बोलले जाते तसेच लिहिले जाते अशी सर्वसामान्य भारतीयाला समजणारी हिंदी भाषा असूनही आपली हिंदीचे खाते परंतु हिंदीचे मात्र नाही ही दुर्दैवाची बाब आहे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या हिंदी अभ्यासमंडळाचे सदस्य व जयभवानी महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्रोफेसर सय्यद शौकत यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचलित यशवंतराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान



महाविद्यालयात १४ सप्टेंबर रोजी आयोजित हिंदी सप्ताह समापन समारोह' कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गणेश पावसे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, हिंदी विभागप्रमुख डॉ. कासीम राव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कासीम राव यांनी केले. यावेळी प्रा. [illegible] शेख यांनी हिंदी भाषेच्या महतीविषयी मनोगत व्यक्त केले. प्रीती अडागळे, अमोल सांगळे, भाग्यश्री नागरगोजे, स्वाती होके या विद्यार्थीनी हिंदी भाषेचा गौरव व्यक्त करत आपली मनोगते व्यक्त केली. प्रोफेसर सय्यद शौकत आपल्या काव्यमय व खुमासदार शैलीतील मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले की, जागतिक स्तरावर १६० पेक्षा अधिक विद्यापीठांमधून हिंदी भाषेचा व साहित्याचा मोठ्या आदराने व कुतूहलाने अभ्यास केला जातो परंतु हिंदी आपली राजभाषा असूनही आपण भारतीय नागरिक हिंदी भाषेला विशेष महत्व देत नाही ही खेदाची बाब आहे. कित्येक लोकांना हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असूनही हिंदीचा दैनंदिन जीवनात ते वापर करत नाहीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बलराज अविले यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा.अनंत साळे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
09SEP2022

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात हिंदी सप्ताहाचे उद्‌घाटन

पाटोदा, दि.८ (लोकाशा न्युज):– येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. ८ सप्टेंबर रोजी हिंदी सप्ताहाचे उद्धाटन उत्साहात संपन्न झाले.

उद्धाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर पदव्युत्तर विभाग संचालक डॉ.मनोजकुमार प्रकाश, हिंदी विभागप्रमुख डॉ. बळीराम राख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.जयंत साठे यांनी केले. याप्रसंगी प्रा. बलराज अविळे यांनी हिंदी साहित्याचा इतिहास व हिंदी भाषेचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. मनोजकुमार प्रकाश यांनी व्यावहारिक जीवनात भाषेचे महत्व विषद केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की, दैनंदिन जीवनात मातृभाषेव्यतिरिक्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रचलित भाषा अवगत असणे आवश्यक आहे म्हणून विद्यार्थ्यांनी मातृभाषेबरोबरच हिंदी व इंग्रजी भाषांवर प्रभुत्व मिळवून भाषांचा दैनंदिन जीवनात सातत्याने वापर केला पाहिजे.

हिंदी सप्ताहानिमित्य महाविद्यालयाच्या हिंदी विभागामार्फत विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कावेरी खुरणे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ.सय्यद शानूर यांनी केले.